भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय २०११-१२/९६
डीजीबीए.सीडीडी.क्र. ९०२२/१३.१.२९९/२०११-१२

दि. जुलै १, २०११
अषाढ १०, १९३३ (एस)

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक
भारतीय स्टेट बँक व सहकारी बँका
१७ राष्ट्रीयीकृत बँका
ॲक्सिस बँक लि./आयसीआयसीआय बँक लि./आयडीबीआय बँक लि./
एचडीएफसी बँक लि./स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

महोदय/महोदया

**रिलीफ/बचत रोख्यांमधील नामनिर्देशन सुविधेवरील महापरिपत्रक**

डिपार्टमेंट ऑफ गव्हर्मेंट अँड बँक अकाउंट्स, केंद्रीय कार्यालय, आरबीआयद्वारा वेळोवेळी, रिलीफ/बचत रोखेधारकांना नामनिर्देशन सुविधेबाबत सूचना दिल्या जात आहेत. वरील विषयावरील सर्व कार्यकारी सूचना, एजन्सी बँकांना एकाच जागी उपलब्ध व्हाव्यात ह्यासाठी "रिलीफ/बचत रोख्यांसाठी नामनिर्देशन सुविधा "वरील सुधारित महापरिपत्रक देण्यात येत असून ते दरसाल ३० जून रोजी अद्यावत करण्यात येते. त्यानुसार ३०.११.२०११ पर्यंत अद्यावत केलेले सुधारित महापरिपत्रक सोबत जोडण्यात आले आहे. आमच्या www.rbi.org.in ह्या वेबसाईटवर ही हे महापरिपत्रक पाहता येईल.

कृपया पोच द्यावी.

आपला
(एस.के बाल)
महाव्यवस्थापक

हा विभाग आयएसओ ९००१-२००० प्रमाणित आहे
डिपार्टमेंट ऑफ गव्हर्मेंट अँड बँक अकाउंट्स, केंद्रीय कार्यालय, मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन समोर, भायखळा मुंबई-४००००८,
टेलि-(०२२) २३०८४१२१; फॅक्स क्र. (०२२) २३०१००९५
ईमेल : cgmicdgbaco@rbi.org.in

## महापरिपत्रक
## रिलिफ/बचत रोखे योजनांमधील नामनिर्देशन सुविधा

१) प्रोमिसरी नोट किंवा बेअरर बॉंडच्या स्वरुपात नसलेले सोडून,रिलिफ/बचत रोख्यांचा एकमेव धारक किंवा सर्व संयुक्त धारक (निवेशक), एक किंवा अधिक व्यक्तींना, नामनिर्देशित करु शकतात व त्या एकमेव किंवा संयुक्त धारकाचा मृत्यु झाल्यास त्या व्यक्तींना ते रिलीफ/बचत रोखे मिळविण्याचा व त्यावरील प्रदान मिळविण्याचा हक्क असेल. मात्र नामनिर्देशित केलेली व्यक्ती किंवा त्या व्यक्तीपैकी प्रत्येकजण अशा प्रकारचा रोखा धारण करण्यास सक्षम असली पाहिजे.

२) असे नामनिर्देशन त्या रोखाच्या परिपक्वतेपूर्वी केले जावे.

३) जेथे दोन किंवा अधिक व्यक्तींच्या नावे नामनिर्देशन केले असेल तेथे, त्यांच्यापैकी एका व्यक्तीचा किंवा कोणत्याही व्यक्तीचा मृत्यु झाल्यास, जीवित असलेला एक किंवा अनेक नामनिर्देशितांना ते रिलिफ/बचत रोखे मिळविण्याचा व त्यावरील प्रदान मिळविण्याचा हक्क असेल.

४) एखाद्या रिलीफ/बचत रोख्यांच्या धारकाने.धारकांनी केलेले नामनिर्देशन, विहित केलेल्या रितीने नवीन नामनिर्देशन करुन आणि ते लेखी स्वरुपात, प्राधिकृत सार्वजनिक/खासगी क्षेत्रातील बॅंकेच्या नेमलेल्या शाखेकडे सादर करुन, बदलले किंवा रद्द केले जाऊ शकते.

५) नामनिर्देशित अल्पवयीन असल्यास,रिलीफ/बचत रोख्याचे धारक, धारकांचा मृत्यु झाल्यास, त्या नामनिर्देशिताच्या, तो अल्पवयीन असल्याच्या काळात, त्याच्या वतीने, त्या रिलीफ/बचत रोख्याचे उत्पन्न मिळण्यासाठी, अल्पवयीन नसलेल्या कोणत्याही व्यक्तीची नेमणुक करु शकतात.

६) एखाद्या बीएलमधील, प्रत्येक गुंतवणुकीसाठी निवेशक वेगवेगळे नामनिर्देशन करु शकतात (वरील (२) मधील अटींचे पालन झाले असल्यास)

७) एजन्सी बॅंकांनी “नामनिर्देशनाची पोचपावती”द्यावी.

८) ८% बचत (करयुक्त) बॉंड्स २००३ च्या बाबत (सबस्क्रिप्शन सुरु असलेला सध्या हा एकच बॉंड आहे), त्याचा एकमेव धारक किंवा सर्व संयुक्त धारक एखाद्या अनिवासी भारतीयाला (एनआरआय) त्याचा/त्यांचा नामनिर्देशित करु शकतात आणि त्याबाबतचे व्याज प्रदान आणि/किंवा परिपक्वता मूल्य ह्यांना एनआरआयना लागु असणारे विनियम लागु असतील.
अपवाद - पुढील बाबतीत नामनिर्देशन करण्यास परवानगी नाही :-

अ) एखादा बीएलए एखाद्या प्रौढ व्यक्तीने अल्पवयीन व्यक्तीच्या वतीने धारण केला असल्यास
ब) धारकाचा त्या बीएलएमध्ये हितसंबंध नसून तो केवळ प्राधिकृतपणे किंवा कायद्याने दिलेल्या क्षमतेत धारण केला असल्यास

नामनिर्देशन रद्द करणे - पुढील बाबतीत आधी केलेले नामनिर्देशन आपोआप रद्द होईल.

अ) धारकाने/धारकांनी एजन्सी बॅंकांकडे नामनिर्देशन बदली किंवा रद्द करण्यासाठी अर्ज केल्यास व ते बदलीकरण किंवा रद्दीकरण कार्यालयाने पंजीकृत केले असल्यास.

ब) धारकांनी ते प्रमाणपत्र दुसऱ्याच एखाद्या पक्षाला हस्तांतरित केल्यास.

वरील महापरिपत्रक, ह्या विभागाच्या ज्या परिपत्रकांवर आधारित तयार करण्यात आले आहे. त्यांची यादी खाली दिली आहे.

१) संदर्भ - मेमोरँडम ऑफ प्रोसिजर - पृष्ठ ३
(विशिष्ट बाबतीत सविस्तार स्पष्टीकरण पाहिजे असल्यास वर निर्देशित परिपत्रकांचा संदर्भ घ्यावा.

i) आरईएफ. मेमोरँडम ऑफ प्रोसिजर - पृष्ठ ३
ii) आरईएफ. सीओ.डीटी.१३.०१.२०१/४०८७/२०००-०१ दिनांक .१६-२-२००१
iii) आरईएफ. सीओ.डीटी.१३.०१.२०१/४८५४/२०००-०१ दिनांक .१९-३-२००१
iv) आरईएफ. सीओ.डीटी.१३.०१.२९८/एच-३४१०/२००३-०४ दिनांक .२०-१२-२००३
v) आरईएफ. सीओ.डीटी.१३.०१.२९९/एच -३४२६/२००३-०४ दिनांक.२०-१२-२००३
vi) आरईएफ. डीजीबीए.सीडीडी. क्र. एच -२१७३/१३.०१.२९९/२००८-०९ दिनांक २-०९-२००८